मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्राचं खाजगीकरण?..

## कोटींचा प्रस्ताव स्थायीसमोर.. निविदा प्रक्रियेत केवळ तीनच निविदा प्राप्त झाल्याने संशयाला वाव?...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीसमोर सेक्टर 23 येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या टप्पा 1 ते 4 च्या अंतर्गत कामांसाठी सुमारे 6.01 कोटी रुपयांचा खाजगीकरणाचा प्रस्ताव येत्या बुधवारी होणाऱ्या (दि.१७) स्थायी समितीच्या मंजुरीसाठी आहे.

या निविदा प्रक्रियेत केवळ तीन निविदा प्राप्त झाल्याने आणि त्यापैकी एका कंपनीला काम देण्याचा प्रस्ताव असल्याने पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होतआहेत.तसेच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात स्वतंत्र मनुष्यबळ आणि सक्षम यंत्रणा उपलब्ध नाही का? असेल तर, जलशुद्धीकरण केंद्राचे संचालन खासगी कंपनीकडे देण्याची गरज काय?



महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जलशुद्धीकरण केंद्र चालविण्याचे काम खाजगी संस्थेकडे सोपविण्यासाठी निविदा मागवल्या होत्या. प्राप्त निविदांमध्ये विनय इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. या कंपनीची निविदा स्वीकारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. या कामासाठी तब्बल 6 कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे.

तसेच निविदेत 1 टक्का सेवा शुल्क, भाववाढ, किमान वेतनवाढीचा अतिरिक्त भार आणि जीएसटी यामुळे अंतिम खर्च आणखी वाढू शकतो, अशी शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. त्यामुळे सुरुवातीला 6.01 कोटी रुपयांचा असलेला खर्च प्रत्यक्षात वाढू देखील शकतो. या प्रस्तावाला स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू होणार असली तरी, जलशुद्धीकरणासारखी अत्यावश्यक सेवा टप्प्याटप्प्याने खासगी ठेकेदारांकडे दिली जात असल्याने सुज्ञ नागरिकांमधून नाराजीचा सूर पुढे येऊ लागला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीसमोर सेक्टर 23 येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या टप्पा 1 ते 4 च्या अंतर्गत कामांसाठी सुमारे 6.01 कोटी रुपयांचा खाजगीकरणाचा प्रस्ताव येत्या बुधवारी होणाऱ्या (दि. १७) स्थायी समितीच्या मंजुरीसाठी आहे.

# पाणी कपातीचे संकट; जलतरण तलाव बंद, वॉशिंग सेंटरवर कारवाईचे आदेश

## पवना धरणात केवळ 20 टक्के पाणीसाठा; पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी महापौरांचे कठोर निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरावर पाणी कपातीचे संकट आले आहे. त्यामुळे महापालिकेचे जलतरण तलाव बंद करावेत आणि वॉशिंग सेंटरवर कारवाई करा, असे आदेश महापौर रवी लांडगे यांनी सोमवारी महापालिका प्रशासनास दिले आहेत.



पिंपरी-चिंचवड शहरासह मावळतालुक्यातील विविध गावांना पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. धरणातून सोडलेले पाणी नदीवरील रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातून उचलते. दररोज 550 एमएलडी अशुद्ध पाणी उपसा करून ते निगडीतील प्राधिकरण येथील सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. तेथे शुद्धीकरण प्रक्रिया करून संपूर्ण शहराला जलवाहिनीद्वारे पुरविले जाते. पवना धरणातून मावळातील नगरपालिका, ग्रामपंचायत आणि एमआयडीसीलाही पाणी दिले जाते.

महापौर लांडगे म्हणाले, की पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. यंदा पाऊस लांबला असल्यामुळे पाणी कमी पडू शकते. पाटबंधारे विभागाने महापालिकेस 15 टक्के पाणी कपात करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाण्याबाबत लवकरच आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

तत्पूर्वी शहरातील महापालिकेचे सर्व जलतरण तलाव तातडीने बंद करावेत, पाण्याची नासाडी आणि अपव्यय थांबवावा. त्याचबरोबर वॉशिंग सेंटरच्या माध्यमातून पाण्याचा होणारा अपव्यय थांबविणे गरजेचे आहे. त्यांच्यावर प्रशासनाने कारवाई करावी आणि नियम मोडणाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत, असे आदेश महापौर लांडगे यांनी दिले आहेत.

### पवना धरणात 20 टक्केच पाणीसाठा

**» शहराची जीवनदायिनी असणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा 20 टक्क्यांवर, तर आंद्रा धरणातील पाणीसाठा 29 टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने महापालिकेला 15 टक्के पाणी कपातीची सूचना केली आहे. मात्र, याबाबत येत्या पंधरवड्यात निर्णय घेण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत आजच्या सभेत पाण्याबाबत काही नगरसेवकांनी मते व्यक्त केली. त्यावर महापौर लांडगे यांनी पाणी कपातीचे सुतोवाच केले आहे.**

# पिंपळे गुरवमध्ये बेकरी पदार्थांबाबत गंभीर प्रश्न; अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन

## केक, ब्रेड व क्रीमरोलवर उत्पादन तारीख व बॅच नंबर गायब; आरोग्य धोक्यात असल्याने तपासणीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे गुरव येथील काही बेकरी दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मफिन, फ्रूट केक, क्रीमरोल आणि दैनंदिन आहारात वापरल्या जाणाऱ्या स्लाईस ब्रेडसारख्या पॅकबंद बेकरी पदार्थांच्या पॅकेजिंगवरून अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक उत्पादनांवर उत्पादन तारीखच गायब आहे. धक्कादायक बाब म्हणजे बहुतेक केकच्या पाकिटांवर बॅचनंबरसुद्धा लिहिलेले नाहीत. त्यातच आता लहान मुलांच्या आवडीच्या क्रीमरोलमधील क्रीम दर्जाहीन आणि सुकलेली आढळत असल्याने हा थेट नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक बेकरीमध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या चॉकलेट मफिन, मिक्स फ्रूट केक आणि क्रीमरोलच्या पाकिटांची पाहणी केली असता, नियम धाब्यावर बसवल्याचे चित्र समोर आले आहे. काही पाकिटांवर फक्त EXP 15/06/2026 आणि EXP 15/07/2026 असे थेट महिना-दोन महिन्यांनी संपणारे एक्सपायरी डेटचे शिक्के मारण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.





### अन्नातून विषबाधा होण्याचा धोका

» या संपूर्ण प्रकारात ग्राहकांनी एक अत्यंत धक्कादायक निरीक्षण नोंदवले आहे. पूर्वी क्रीमरोल खाताना आतमध्ये मऊ आणि ताजी क्रीम लागायची. मात्र, आता पिंपळे गुरवमधील बेकरीत मिळणाऱ्या क्रीमरोलमध्ये त्या मऊ क्रीमऐवजी वेगळ्याच प्रकारची सुकलेली, कडक आणि चिवट क्रीम पाहायला मिळत आहे. क्रीमरोल किंवा पेस्ट्रीमधील क्रीम ही दूध, डालडा किंवा बटरपासून बनते. जर क्रीम सुकलेली किंवा कडक झाली असेल, तर याचा अर्थ तो पदार्थ जुना आहे किंवा त्यात निकृष्ट दर्जाचे तेल/डालडा वापरण्यात आले आहे. अशी सुकलेली क्रीम पोटात गेल्यास लहान मुलांना तीव्र पोटदुखी, उलट्या आणि अन्नातून विषबाधा (Food Poisoning) होण्याचा मोठा धोका असतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

अन्न सुरक्षा विभागाने या प्रकाराची तात्काळ दखल घेणे गरजेचे आहे. पिंपळे गुरवमधील बेकरींमध्ये अचानक तपासणी करून संशयास्पद ब्रेड, केक आणि सुकलेल्या क्रीमच्या क्रीमरोलचे नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत आणि ग्राहकांच्या जिवाशी खेळणाऱ्या बेजबाबदार उत्पादकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

दररोज सकाळी घरोघरी खाल्ल्या जाणाऱ्या स्लाईस ब्रेडच्या पाकिटांवरही फक्त एक्सपायरी डेट टाकली जात आहे. सामान्यतः ब्रेड हा ३ ते ४ दिवसांत खराब होतो. मात्र, त्यावर आठ ते दहा दिवसांनंतरची एक्सपायरी डेटचा शिक्का मारून तो बाजारात विकला जात आहे. हवेतील दमटपणामुळे ब्रेडवर बुरशी येण्याची शक्यता असते, जी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

### ग्राहकांनो, खरेदी करताना हे नक्की तपासा!

» पाकिटावर उत्पादन तारीख (Mfg Date) आणि बॅच नंबर (Batch No.) छापलेला आहे का?
» बेस्ट बिफोर" किंवा एक्सपायरी तारीख स्पष्ट वाचता येते का? (की फक्त वरून शिक्का मारला आहे?)
» FSSAI चा १४ अंकी परवाना क्रमांक पाकिटावर आहे का?
» क्रीमरोल किंवा केक घेताना तो हाताने दाबून पहा, तो प्रमाणापेक्षा जास्त कडक किंवा कोरडा वाटल्यास खरेदी टाळा.
» ब्रेडवर कुठेही पांढरट किंवा काळे डाग (बुरशी) दिसत आहेत का?

### नियम काय सांगतो?

» अन्न सुरक्षा नियमांनुसार कोणत्याही पॅकबंद खाद्यपदार्थावर उत्पादनाची तारीख आणि बॅच क्रमांक असणे अनिवार्य आहे. बॅचनंबर नसल्यास तो पदार्थ नेमका कधी आणि कुठे तयार झाला, याची नोंद तपासता येत नाही. पिंपळे गुरवमधील उत्पादनांवरून हीच महत्त्वाची माहिती गायब असल्याने अन्न सुरक्षा नियमांचे सरळ-सरळ उल्लंघन होत आहे.

# ऑक्सिजन पार्कच्या देखभालीसाठी पुन्हा त्याच संस्थेला थेट पद्धतीने काम?..

## चिंचवड व पुनावळेतील उद्यानांच्या देखभालीसाठी थेट काम देण्याचा प्रस्ताव; पारदर्शकतेबाबत नागरिकांकडून सवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड व पुनावळे येथील ऑक्सिजन पार्कच्या देखभालीसाठी तब्बल ५५ लाख रुपयांचे काम "नारी द वुमन" या संस्थेला थेट पद्धतीने देण्याचा प्रस्ताव बुधवारी होणाऱ्या स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी आहे. मात्र, निविदा प्रक्रिया न राबविता पुन्हा त्याच संस्थेला थेटपणे काम देण्याच्या हालचालीमुळे सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर सवाल उपस्थित होत आहेत.

चिंचवड येथील ऑक्सिजन पार्क २०२२ पासून या संस्थेकडे देखभालीसाठी आहे. त्यानंतर वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. पुनावळे येथील ऑक्सिजन पार्कही संबंधित संस्थेकडे देण्यात आले होते. आता दोन्ही उद्यानांची देखभाल पुढील १८ महिन्यांसाठी पुन्हा त्याच संस्थेला देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, सुमारे १३ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या या उद्यानांच्या देखभालीसाठी ५५ लाख ७ हजार ७८४ रुपयांचा खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. या कामासाठी खुली निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे इतर स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट किंवा सामाजिक संस्थांचा विचार या कामासाठी का झाला नाही?, त्यांनाही समान संधी का देण्यात आली नाही?, असा प्रश्न जाणकार नागरिक उपस्थित करीत आहेत.



### समान संधीचा मुद्दा ऐरणीवर

» सुमारे १३ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या ऑक्सिजन पार्कच्या देखभालीसाठी ५५ लाखांहून अधिक खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. मात्र या कामासाठी इतर स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, सामाजिक संघटना किंवा पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना संधी देण्यात आली नसल्याची बाब चर्चेत आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामांमध्ये सर्व पात्र संस्थांना समान संधी मिळणे अपेक्षित असताना थेट कामवाटपाची पद्धत योग्य आहे का, यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे या प्रस्तावावर स्थायी समितीत सविस्तर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नाट्यगृहाच्या आरक्षणासाठी ॲप अनिवार्य करणार; स्थायी समितीचा निर्णय

## बालगंधर्व रंगमंदिरात एकाच वेळी दोन कार्यक्रमांची वेळ आरक्षीत झाल्याने त्याचे पडसाद स्थायी समितीच्या बैठकीत उमटले.

**पुणे | प्रतिनिधी**

बालगंधर्व रंगमंदिरात एकाच वेळी दोन कार्यक्रमांची वेळ आरक्षीत झाल्याने त्याचे पडसाद स्थायी समितीच्या बैठकीत उमटले. नगरसेवकांनी प्रशासनाच्या कारभारावर टीकेची झोड उठवून पुन्हा असे प्रकार घडू देऊ नका असे सुनावले. बालगंधर्व रंगमंदिरासह अन्य महत्वाच्या नाट्यगृहांचे ठराविक लोकांकडे महत्वाच्या दिवसांचे आरक्षण कसे काय जाते ? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. हे प्रकार टाळण्यासाठी रंगयात्रा ॲपद्वारे ऑनलाइन आरक्षण सुरु करा, दबावाला बळी पडू नका असे आदेश स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले आहेत.

पुणे महापालिकेने बालगंधर्व रंगमंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, आण्णाभाऊ साठे नाट्यगृह यासह अन्य ठिकाणी राजकीय कार्यक्रम तसेच नाटकांसाठी मोठी मागणी आहे. हे नाट्यगृह उपलब्ध व्हावे यासाठी कलाकार मंडळींकडून प्रयत्न केले जातात महापालिका दर तीन महिन्यांनी याची सोडत काढून आरक्षण निश्चित करते. पण यामध्ये काही एजंट सराईतपणे आठवड्याचा शेवटचा दिवस, सार्वजनिक सुट्टीचे दिवस अशा महत्वाच्या दिवसांचे आरक्षण घेतात. नंतर या तारखांचे आरक्षण जास्त पैसे घेऊन विकत आहेत.

बालगंधर्व रंगमंदिरात तीन दिवसांपूर्वी नाटक आणि श्रद्धांजली सभेला एकच वेळ देण्यात आली. श्रद्धांजली सभेला उशीर झाल्याने नाट्यरसिकांनी आतमध्ये जाऊन गोंधळ घातल्याचा प्रकार घडला यापार्श्वभूमीवर आज स्थायी समितीमध्ये चर्चा झाली. रंगयात्रा ॲपचा वापर करून ऑनलाइन बुकींग घ्यावे. त्यासाठी कलाकार, नाट्यनिर्माते, नाट्यरसिक, लोकप्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा करून ॲपमध्ये योग्य ते बदल करावेत, त्याचे धोरण तयार करावे. पण ऑफलाइन आरक्षण न देता ऑनलाइन आरक्षण दिले गेले पाहिजे.




### 'रंगयात्रा' ॲपद्वारे ऑनलाइन आरक्षणाचा आग्रह

» नाट्यगृह आरक्षण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी 'रंगयात्रा' ॲपचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले आहेत. सध्या ऑफलाइन प्रक्रियेमुळे गैरव्यवहार आणि दबावाचे प्रकार वाढत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे कलाकार, निर्माते, नाट्यरसिक आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करून ॲपमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले. भविष्यात सर्व आरक्षणे ऑनलाइन पद्धतीनेच करण्याचा विचार असून त्यामुळे सर्वांना समान संधी मिळेल. तसेच आरक्षण प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

### दुहेरी आरक्षणावरून प्रशासन धारेवर

» बालगंधर्व रंगमंदिरात एकाच वेळी दोन कार्यक्रमांना परवानगी दिल्याच्या प्रकारामुळे महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. श्रद्धांजली सभा आणि नाट्यप्रयोग यांची वेळ एकच ठरल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. स्थायी समिती बैठकीत नगरसेवकांनी प्रशासनावर तीव्र टीका करत भविष्यात अशा चुका टाळण्याची मागणी केली. महत्त्वाच्या तारखांचे आरक्षण काही मोजक्या व्यक्तींकडे कसे जाते, याची चौकशी करण्याचीही मागणी करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि नियोजनाचा अभाव असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाल्याचे सदस्यांनी नमूद केले.

> 'महापालिकेच्या सर्वच सेवा ऑनलाइन होत आहेत, असे असताना रंगयात्रा ॲपचा वापर करून ऑनलाइन आरक्षण वाटप झाले पाहिजे. यामध्ये कोणीही दबाव आणला तरी आम्ही या भूमिकेवरून माघार घेणार नाही.'
>
> - श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती

# मुठा नदीपात्र स्वच्छता अभियानात पर्यावरणप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

## या अभियानात गुड मॉर्निंग ग्रुप, कात्रज तसेच एच. व्ही. देसाई कॉम्पिटिटिव्ह एक्झाम्स सेंटर यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**पुणे | प्रतिनिधी**

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आणि स्वस्तिक इको एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने मुठा नदीपात्र स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत भविष्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानात गुड मॉर्निंग ग्रुप, कात्रज तसेच एच. व्ही. देसाई कॉम्पिटिटिव्ह एक्झाम्स सेंटर यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. नदी स्वच्छतेच्या या उपक्रमात तब्बल ७३ पर्यावरणप्रेमींनी सहभागी होत मुठा नदीपात्रातील कचरा हटविण्यासाठी श्रमदान केले.

पर्यावरण संवर्धन आणि नदी स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या अभियानामुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल सकारात्मक संदेश पोहोचला. सहभागी स्वयंसेवकांनी भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.



### नदी संवर्धनाचा सकारात्मक संदेश

» मुठा नदी स्वच्छता अभियानामुळे पर्यावरणाबाबत जागरूकता वाढविण्याचा महत्त्वाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला. सहभागी स्वयंसेवकांनी भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये नियमित सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. आयोजकांनी सर्व स्वयंसेवक, सहभागी संस्था आणि सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे आभार मानले. पर्यावरण संवर्धन, नदी स्वच्छता आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्यासाठी अशा सामूहिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### पर्यावरणासाठी सामूहिक पुढाकार

» श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आणि स्वस्तिक इको एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने मुठा नदीपात्र स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत पर्यावरणाच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नदीपात्रातील कचरा हटवून परिसर स्वच्छ करण्यासाठी स्वयंसेवकांनी श्रमदान केले. नदी स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे तर समाजाचीही जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक सहभाग किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव या अभियानामुळे नागरिकांना झाली.

# तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली? मुख्यमंत्र्यांसह सरकारला थेट इशारा

## अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाई सत्रामुळे पुन्हा एकदा त्यांच्या बदलीची चर्चा रंगली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची काही दिवसांपूर्वी नियुक्ती झाली. तेव्हापासून या विभागाकडून कारवाईची धडक मोहीम राज्यभरात सुरू आहे. भेसळ करणाऱ्यांवर दररोज कठोर कारवाई केली जात असून, करोडो रुपयांचा माल जप्त केला जात आहे. यामुळे भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. या पार्श्वभूमीवर आता मुंढे यांच्या बदलीची चर्चा सुरू झाली असून, याबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने मुख्यमंत्र्यांसह सरकारला थेट इशारा दिला आहे.

सनदी अधिकारी असलेले तुकाराम मुंढे हे कायम चर्चेत असतात. त्यांच्या कामकाजाच्या पद्धतीमुळे त्यांना वारंवार बदलीला सामोरे जावे लागते. याचबरोबर सरकारकडून अनेक वेळा त्यांना अडगळीच्या विभागांमध्ये नियुक्ती दिली जाते. त्यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचा कारभार दिल्यापासून हा विभाग खडबडून जागा झाला आहे. वर्षभरात बोटावर मोजता येतील एवढ्याच कारवाया करणारा हा विभाग आता दररोज धडक कारवाया करू लागला आहे. याआधी विभागातील अधिकारी कारवाई न करण्याचे कारण म्हणून मनुष्यबळाच्या कमतरतेकडे बोट दाखवत. परंतु आता असे काय अचानक झाले आणि मनुष्यबळाच्या कमतरतेचा प्रश्न सुटण्याआधी कारवायांना वेग आला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यात सुरू असलेल्या कारवायांमुळे आता तुकाराम मुंढे यांची बदली होण्याची चर्चा सुरू आहे. याबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय सागर म्हणाले की, मुंढे यांच्याकडून सुरू असलेली कारवाई ग्राहकांच्या हिताची आणि कल्याणाची आहे. त्यांच्या कारवाईला आमचा पाठिंबा आहे. त्यांच्या बदलीसाठी व्यापारी वर्गाकडून सरकारवर दबाव आणला जात आहे, मात्र सरकारने हा दबाव झुगारून टाकावा. मुंढे यांची बदली सरकारने करू नये, यासाठी आम्ही ग्राहकांमध्ये जनजागृती करणार आहोत. यासाठी व्यापक स्वाक्षरी मोहीम राबवणार आहोत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रही लिहिणार आहोत. याप्रकरणी मुंढे यांची आज आम्ही मंत्रालयात भेट घेणार आहोत.



### बदलीच्या चर्चेवर ग्राहक संघटनांचा आक्षेप

**» तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीची चर्चा सुरू होताच ग्राहक संघटना आक्रमक झाल्या आहेत. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने त्यांच्या कामकाजाचे कौतुक करत बदलीला विरोध दर्शविला आहे. ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय सागर यांनी सरकारने कोणत्याही दबावाला बळी पडू नये, असे स्पष्ट केले आहे. भेसळखोरांविरोधातील कारवाई ग्राहकांच्या हितासाठी आवश्यक असल्याने मुंढे यांना पूर्ण पाठबळ देण्याची भूमिका संघटनेने घेतली आहे. त्यांच्या बदलीविरोधात राज्यभर जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम राबविण्याचाही इशारा ग्राहक संघटनांकडून देण्यात आला आहे.**

### २१ वर्षांत तब्बल २५ बदल्या

**» सनदी अधिकारी तुकाराम मुंढे हे त्यांच्या कठोर आणि थेट प्रशासकीय शैलीसाठी ओळखले जातात. गेल्या २१ वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत त्यांची तब्बल २५ वेळा बदली झाली आहे. अनेकदा एखाद्या पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची बदली करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. प्रशासनातील पारदर्शकता, शिस्त आणि नियमांची कठोर अंमलबजावणी यावर भर देणारी त्यांची कार्यपद्धती काही हितसंबंधी गटांना अस्वस्थ करणारी ठरते, अशी चर्चा कायम होत असते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक नव्या नियुक्तीनंतर आणि धडक कारवायांनंतर बदलीच्या चर्चांना नेहमीच उधाण येत असल्याचे पाहायला मिळते.**

### धडक कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये खळबळ

**» अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि नियमबाह्य उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात कारवाया सुरू केल्या आहेत. अनेक ठिकाणी छापे टाकून कोट्यवधी रुपयांचा संशयित माल जप्त करण्यात आला आहे. यामुळे अनेक वर्षांपासून निष्क्रिय असल्याची टीका सहन करणारा विभाग आता सक्रिय झाल्याचे चित्र दिसत आहे. सातत्याने सुरू असलेल्या कारवायांमुळे भेसळखोर आणि नियमभंग करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्राहकांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने या मोहिमेला महत्त्व प्राप्त झाले आहे.**

# शिवरेतील शेतकऱ्यांवर भूसंपादनाची कुऱ्हाड; आर्थिक कणा मोडल्याची भावना

## रिंगरोड, महामार्ग आणि वीजवाहिनी प्रकल्पांमुळे शेतीचे क्षेत्र घटले; पुनर्वसन व मोबदल्याचा प्रश्न कायम

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून शिवरे (ता. भोर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांसाठी सतत संपादित केल्या जात आहेत. त्याबदल्यात या शेतकऱ्यांना नोकरीची, पुनर्वसनाची हमी मिळत नाही. तसेच मोबदलाही मिळत नाही. परिणामी, शिवरेकरांत अक्षरशः आर्थिक कणा मोडला जात असल्याची भावना निर्माण झाली आहे.

शिवरे हे निसर्गाने नटलेल्या आणि बागायत शेतशिवारने सजलेले गाव. मात्र, गेल्या ३५ वर्षांपासून शासनाकडून विविध प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन केले जात आहे. येथील जमिनी कधी महामार्ग, रस्ते विकास महामंडळ, वीज महामंडळाला, तर कधी रस्ता रुंदीकरणाला संपादित केल्या जात आहेत. यामुळे शेतीचे तुकडे होऊन शेतकरी अल्पभूधारक आणि भूमिहीन होत आहे.

पुणे-सातारा महामार्ग एकेकाळी बोरमाळ - शिवरे - वरवे- काळूबाई मंदिरपासून पुढे शिरवळ असा जात होता. काही कालावधीनंतर बाहेरून हा महामार्ग काढला गेला. यात अनेकांच्या जमिनी गेल्या. सध्या सुरू असलेल्या रिंगरोडसाठी पुलाची वाडी, कानिफनाथवस्ती, नाईकवस्ती, अमृतसरोवर लगत असे एकूण तब्बल १२३ एकर जमिनी संपादित केल्या आहेत. त्यातच आता वीज महामंडळाच्या मनोऱ्यासाठी १३ शेतकऱ्याच्या जमिनीवर भूसंपादनाची टांगती तलवार आहे.

अति उच्चदाबाची ४०० के.व्ही. जेजुरी, विंझर-हिंजवडी मार्गावरून प्रस्तावित विद्युतवाहिनी लाईन शिवरे येथून जात आहे. एकूण ९७.५ किलोमीटर लांबीची दुहेरी परिपथ वाहिनीसाठी शिवरे गावातून जवळपास साडेतीन किलोमीटर शेती झोनमधून जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. विजेसाठी जाणाऱ्या बाधित जागेत शासन कुठल्याही व्यावसायिक कामासाठी अथवा घर बांधण्यासाठी परवानगी देणार नाही.



### रिंगरोडसाठी १२३ एकर जमीन संपादित

**» सध्या सुरू असलेल्या रिंगरोड प्रकल्पामुळे शिवरे गावातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पुलाची वाडी, कानिफनाथवस्ती, नाईकवस्ती आणि अमृतसरोवर परिसरातील तब्बल १२३ एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. यापूर्वी पुणे-सातारा महामार्गासाठीही अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या होत्या. वारंवार होणाऱ्या भूसंपादनामुळे शेतीयोग्य क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. गावातील बागायती जमिनींचे प्रमाण घटत असून कृषी उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे. विकासकामांच्या नावाखाली शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची भावना स्थानिकांमध्ये वाढत आहे.**